NO. APC-715
Dt. 04-06-2002

जा. क्र. मु. अ/औ. मं/डिबो/बैठक/ 2945 /2002
मुख्याधिकारी यांचे कार्यालय,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. दिनांक: 4/6/2002

प्रति,
कार्यकारी अभियंता. औरंगाबाद विभाग/लातूर विभाग
मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ
मिळकत व्यवस्थापक/औरंगाबाद मंडळ
मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांचे स्वीय सहाय्यक ।
~~सहाय्यक~~ वास्तुतंः औरंगाबाद मंडळ.
विधी सहाय्यक औरंगाबाद/मंडळ.

विषय :- दि 21/5/02 रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर कार्यवाही करणेबाबत.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दि. 21/5/2002 रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत यासोबत जोडला आहे. सदर कार्यवृत्तांतावर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल त्वरीत सादर करावा.

सोबत: वरीलप्रमाणे.

मुख्य अधिकारी,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. करीता

प्रत आस्थापना विभाग.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

दि. २.५.२००२ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद मंडळाच्या ११९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] मा. श्री. के. बी. गवळी. | .. | उप-सभापती तथा मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ व बैठकीचे सभापती. |
| २] मा. श्री. विश्वास उपासे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ३] मा. श्री. मकरंद सावे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ४] मा. श्री. साहेबराव खरात. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ५] मा. श्री. बबनराव देशमुख | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ६] मा. श्री. राजेश्वर चव्हाण. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ७] मा. ॲड. श्री. जे. पी. पाटील. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ८] मा. श्री. चांदपाशा इनामदार. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ९] मा. डॉ. श्री. डी. डी. शिंदे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| १०] मा. श्री. वामनराव राऊत. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ११] मा. सौ. शैलेजा गायकवाड. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| १२] मा. श्री. डी. पी. कुलकर्णी. उप अभियंता, म. न. पा. [मा. आयुक्त, म. न. पा. यांचे प्रतिनिधी]. | .. | - प्रतिनिधी - |
| १३] मा. श्री. मो. मुदस्सीर. मा. उपसंचालक, नगर रचना, यांचे प्रतिनिधी. | .. | - प्रतिनिधी - |

मंडळाच्या बैठकीचे कामकाज सुरु होण्यापूर्वी, मंडळाचे सभापती, मा. आ. श्री. नागरे साहेब हे काही महत्वाच्या व अपरिहार्य कामामुळे मंडळाच्या बैठकीस येऊ शकणार ~~नाहीत व बैठक~~ नसल्याने मंडळाचे उप-सभापती व मुख्य अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी अशा सूचना मा. सभापती यांनी दिल्याचा संदेश श्री. फड, कनिष्ठ लिपीक यांनी बैठकीत दिला. मा. सभापती व मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य यांचे वतीने मंडळाचे नुतन मुख्य अधिकारी यांचे स्वागत बैठकीत श्री. फड यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. तसेच मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. के. बी. गवळी यांनीही मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले व पटलावरील विषयावर चर्चा करण्यास सुरुवात केली.

विषय क्रं. [१] : दि. १. ३. २००२ रोजी झालेल्या ११८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे बाबत.

---

१. दि. १. ३. २००२ रोजी झालेल्या ११८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत मंडळाचे उप अभियंता श्री. पाटील यांनी मंडळास वाचून दाखविला. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यापूर्वी मंडळाचे मा. सदस्य श्री. डी. डी. शिंदे यांनी प्रतिपादन केले की, मागील बैठकीत [ म्हणजे ११८ व्या बैठकीत] गृहनिर्माण भवना जवळील दुकान क्रं. २३, २६ व २७ च्या निविदा हया समतोल दराच्या प्राप्त न झाल्यामुळे त्या रद्द करुन हया दुकानासाठी फेर निविदा मागवाव्यात असा मंडळाने निर्णय घेतला आहे. परंतु दुकान क्रं. २३, २६ व २७ साठी ज्या निविदा भरल्या आहेत त्या मंडळाच्या अपसेट किंमतीपेक्षा जास्तीच्याच आहेत. म्हणून सदर दुकाने बांधून जवळपास ५ वर्षे झाली आहेत व हया दुकानाच्या निविदा मागवूनही जवळपास सहा महिने झाले आहेत व अशा प्रकारे वाटपास/विक्रीस विलंब होत आहे व आता पुन्हा जाहिरात देऊन दुकानाच्या निविदा मागविल्यास परत विलंब होईल व परिणामी हयामध्ये कालापव्यय होत आहे. जरी या निविदा कमी दराच्या असमतोल दराच्या असल्या तरी सदर निविदाधारक ही दुकाने निविदेतील दरामध्ये वाढ करुन दुकाने घेण्यास तयार आहेत का ? याबाबत निविदाधारका बरोबर पुन्हा मुख्य अधिकारी यांनी वाटाघाटी करण्यास्तव त्यांनी वाटाघाटीमध्ये दर वाढवून पुढील बैठकीत विचारात त्याबाबत निर्णय घेणेसाठी त्याचा तपशील मंडळापुढे सादर करावा जर दरामध्ये वाढ केली नाही तर मात्र फेरनिविदा मागवाव्यात असे प्रतिपादन मा. सदस्य डॉ. श्री. शिंदे यांनी केले. मंडळाचे सर्व सदस्य यांनी मा. श्री. शिंदे सदस्य यांचे वरिल सुचनेस सहमती दाखविली.

वरिल समान्ये निर्णयाप्रमाणे प्रकरणी तात्काळ कार्यवाही मुख्य अधिकारी/औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळाच्या आगामी बैठकीत ठेवावा असाही निर्णय मंडळाने घेतला.

२. ११८ व्या बैठकीत ठराव क्रं. ७०६ हा मंजूर करण्यांत आला व ठरावाद्वारे नविन जुळे शहर औरंगाबाद येथील ७ गावांच्या एकुण १००५.०० हेक्टर जमिनी संपादनासाठी शासन स्तरावर मंजूरी घेण्यासाठी व जुळे शहर वसविण्याच्या प्रस्तावास शासनाकडून मंजूरी प्राप्त करुन घेण्यासाठी मंडळाने ठराव क मंजूर केला व सदरचा ठराव कायम करण्यासाठी वर्येत आला असतांना मंडळाचे सदस्य मा. श्री. इनामदार यांना सुचना केली की, नविन जुळ्या शहरासाठी [ औरंगाबाद ] येथिल जमिनी संपादनाची कारवाई मंडळाने सुरु करण्याच्या वेळी मंडळाच्या प्रस्तावात औकाफच्या [ वक्फ बोर्डाच्या] जमिनी समाविष्ठ करण्यांत येवू नये व प्रस्तावास वक्फ बोर्डाच्या जमिनी समाविष्ट राहणार नाहीत याची खातरजमा करुनच मंडळाचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे/ शासनाकडे पाठवावेत. मुख्य अधिकारी/ औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत मंडळास माहिती दिली की, जुळे शहर वसविण्यासाठी संपादनासाठी जमिनी प्रस्तावित आहेत म्हणून ठराव क्रं. ७०६ अन्वये नविन जुळे शहर औरंगाबाद येथिल भूसंपादनातील प्रस्तावीत जमिनीचे खेरदी-विक्री करण्याचे व्यवहार बंद करण्यासाठी जिल्हाधिकारी, उप-संचालक, नगर रचना व नोंदणी कार्यलिय, औरंगाबाद यांना कळवावे म्हणून ठराव संमत केला आहे. ~~परंतु जोपर्यन्त संपादीत जमिनीची शासन अधिसुचना प्रसिध्द होत नाही व~~ परंतु जोपर्यन्त शासनाची प्रस्तावास मंजूरी मिळत नाही तोपर्यन्त असे खेरदी - विक्रीचे व्यवहार बंद करण्यासाठीचे पत्र जिल्हाधिकारी/उपसंचालक नगर रचना/नोंदणी कार्यालय यांना कायदेशिर रित्या देता ~~येत~~ शक्य नाही ~~परंतु~~ जुळे शहराच्या प्रस्तावास व जमिनी संपादनास शासनाची मंजूरी प्राप्त झाल्या नंतर वरिल तीन्हीही कार्यालयांना जमिनी खेरदी विक्रीचे व्यवहार बंद करण्यास पत्राद्वारे कळविता येईल अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास ~~माहिती~~ दिली व म्हणून ठराव क्रं. ७०६ मध्ये अंशत: वरिल प्रमाणे बदल करावा लागेल असे सुचीविले याबाबत मंडळाचे सदस्य यांनी मुख्य अधिकारी/औ. मं. याचे

वरिल प्रस्तावास व मुद्यास सहमती दर्शविली व मंडळाने एकमताने निर्णय घेतला की, औरंगाबाद येथिल जुने शहर वसविण्याच्या प्रस्तावास व जमिनी संपादनाच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी मिळाल्यानंतरच जुने शहर औरंगाबाद येथिल जमिनीचे खरेदी विक्री करण्याचे व्यवहार बंद करण्याविषयी उपरोक्त तिन अधिका-यांना पत्र पाठवावे व वरिल प्रमाणे ठराव क्रं. ७०६ मध्ये अंशतः बदल केल्याबाबत मंडळाने एकमताने निर्णय घेतला व याप्रमाणे पुढील कार्यवाही मुख्य अधिकारी यांनी करावी असेही मंडळाने सूचीत केले.

दि. १. ३. २००२ रोजी झालेल्या ११८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांत वरिल प्रमाणे चर्चा करुन सुचविलेल्या फेरफारासह सर्वानुमते व मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७०९ :-

मंडळाच्या दि. १. ३. २००२ रोजी झालेल्या ११८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वरिल चर्चेनुसार सुचविलेल्या फेरफारासह सर्वानुमते कायम करण्यांत आला.

विषय क्रं. [२] : गारखेडा, औरंगाबाद येथिल स. नं. १८/१/१, १८/ब/३ व २/२ या खाजगी जमिनीच्या संपादनाबाबत.

सदर प्रकरणाचे बाबतीत ~~या विषयाचे~~ [illegible] मुख्याधिकारी यांनी बैठकीत मंडळास माहिती दिली की, एम. पी. लॉ. कॉलेज, औरंगाबाद समोरील सर्वे क्रं. १७ सि. टी. एस. नं. २०५९२ मधून २१७५० चौ. मी. क्षेत्र /जमिन व सि. टी. स. नं. १७८४६ मधुन ८५० चौ. मी. क्षेत्र/जमिन संपादनाद्वारे मंडळाच्या ताब्यात आली होती. त्यानंतर या सि. टी. एस. नं. २०५९२ मधील जमिनीतून २१७५० चौ. मी. क्षेत्र संपादनातुन वगळून ~~याबदली किंवा याच्या~~ त्या बदल्यात गारखेडा येथिल सि. टी. एस. नं. १५३०२ [भाग] १५३०३ [भाग] व १५३०६ [भाग] मधील एकुण क्षेत्र ५ एकर १० गुंठे जमिन म्हाडास देण्यास जमिनीचे मालक तयार झाले व त्यानुसार गारखेडा येथिल एकुण २. १०४९ हे. जमिन, जमिन मालकांनी देऊ केल्यानुसार म्हाडाने संपादित करुन त्याची अंतीम अधिसुचना देखील प्रसिध्द झाली. त्यानंतर सदर जमिनीचे प्रकरण रिट याचिकाद्वारे न्याय प्रविष्ट झाले व नंतर शासनाच्या मंजूरीने ३५% जमिन म्हाडास विनामुल्य देऊन ६५% जमिन संपादनातुन वगळण्यांत यावी अशी तत्वतः मान्यता शासनाने दिल्या नंतर याबाबतीत मंडळाने जमिन मालका समवेत पत्रव्यवहार केला व ३५% म्हाडास विनामुल्य द्यावयाच्या जमिनीचा नकाशा जमिन मालकाने न्यायालयास सादर केला व त्याची एक प्रत मंडळास दिली. सदर ३५% जमिन विनामुल्य मंडळास

देण्याचा नकाशा जो जमिन मालकाने सादर केला त्याची तपासणी मंडळाचे सहाय्यक वास्तुतज्ञ यांनी केली असता असे आढळून आले की, जमिन मालकाने देऊ केलेल्या विनामुल्य ३५% क्षेत्रातील काही क्षेत्र हे विकास आराखडयातील बागेसाठीच्या [ गार्डन ] आरक्षणाने बाधीत आहे व तसेच ते संपादनाबाहेरचे क्षेत्र आहे. त्यामुळे मंडळाने जमिन मालकास कळविले की, त्यांनी सादर केलेल्या नकाशाचे अंदाजे ०.२३ हे. जमिन ही विकास आराखडयात गार्डनसाठी आरक्षित असून ते क्षेत्र मंडळाच्या संपादना बाहेरील असल्यामुळे जमिन मालकाने देऊ केलेली विनामुल्य ३५% क्षेत्र मंडळ घेऊ शकत नाही व असे बाधित क्षेत्र घेण्याच्या अधिकारात येत नाही व अशा आशयाचे पत्र जमिन मालकाला मंडळातर्फे देण्यात आले व त्यात विनंती केली की, मंडळाने जमिन मालकास दिलेल्या नकाशातील म्हाडास द्यावयाच्या ३५% क्षेत्रात [जमिनीस] जमिन मालकाने संमती देऊन मंडळास निर्णय कळवावा. परंतु जमिन मालकाने मंडळाच्या या प्रस्तावास नकार दिला त्यानंतर मंडळातर्फे मा. उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आले व त्या शपथपत्रात मंडळातर्फे कथित करण्यात आले की, जमिन मालकाने मंडळास विनामुल्य ३५% द्यावयाची जमिनीतील काही क्षेत्र हे अधिसुचित [ नोटीफाईड] संपादित क्षेत्रातील नाहीत व जमिन मालकाने दिलेला अर्ज व नकाशा चुकीचा आहे व अधिसुचित जमिनीतूनच ३५% विनामुल्य क्षेत्रास त्याचे उर्वरित जागेतील ले-आऊट मधून पोच रस्ता द्यावा अशा प्रकारचे शपथपत्र मंडळातर्फे कार्यकारी अभियंता श्री. येरावार यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केले- असल्याबद्दलची माहिती ~~कार्यकारी अभियंता~~ यांनी मंडळास दिली. तसेच सदरील शपथपत्राचा प्रारूप तत्कालीन मुख्याधिकारी यांनी मान्य केल्यानंतरच ते शपथपत्र मा. उच्च न्यायालयात दाखल केले असल्याबद्दल कार्यकारी अभियंता यांनी बैठकीत सांगितले.
मा. सदस्य श्री. साचे यांनी प्रतिपादन केले की, विनामुल्य घ्यावयाच्या ३५% जमिनीला अॅप्रोच रोड नाही. जमिन रोड लगत नाही म्हणून अशा जमिनीची मागणी का केली व रोड लगतची ३५% जमिन का घेतली नाही ? व ३५% जमिन ताब्यात न घेताच बाकीच्या ६५% जमिनीवर जमिन मालकास बांधकाम का करु दिले ? मा. सदस्य इनामतदार यांनी प्रतिपादन केले की, ३५% क्षेत्रावर जमिन मालकाने बांधकाम सुरु केले ते मंडळाने का रोखले नाही व महानगरपालिकेला पत्र देऊन ६५% जमिनीवरील महानगर पालिकेने दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यास महानगरपालिकेला मंडळाने का कळविले नाही याची चौकशी होणे भाग आहे. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सध्या ३५% क्षेत्रावर

बांधकाम नाही. परंतु तसेच बाकीच्या ६५% जमिनीवर बांधकाम जमिन मालकाने करू नये व मनपाने दिलेली बांधकाम परवानगी रद्द करावी असे मनपाला पत्राद्वारे कळवूनही मनपाने बांधकाम परवानगी रद्द केली नाही. यावर मंडळाचे सदस्य मा. श्री. साठे व इनामदार यांनी प्रतिपादन केलेले की, आता ३५% विनामुल्य जमिन घेण्याचे व ६५% जमिन सोडण्याचे जे प्रस्तावित आहे त्याप्रमाणे आता ६५% जमिनीवर [मंडळाने सुचविलेली ३५% जमिन प्रत्यक्ष ताब्यात मिळेपर्यंत ] जमिन मालकाने बांधकाम तात्काळ थांबवावे व मनपाने दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यासाठी मनपास व जमिन मालकास कळवावे असे मा सदस्य श्री साठे यांनी सांगितले व मा सदस्य श्री साठे यांनी असेही सांगितलेकी, ३५% जमिन रोडलगत व आरक्षण विरहित जमिन मालकाने मंडळास द्यावी अशा प्रकारचे सुधारित शपथपत्र कोर्टात दाखल करावे. जमिन मालकाने ६५% जमिनीवर खरोखर बांधकाम केले काय असे श्री. साठे मा. सदस्य यांनी बैठकीत विचारले असता कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, जवळपास ६५% जमिनीवर जमिन मालकाने बांधकाम केले आहे व कार्यकारी अभियंता यांनी अशीही माहिती दिली की, ६५% ६५:३५ अशा प्रकारे जमिनीच्या जो पत्र व्यवहार झाला त्याची मोघमपणे पत्रव्यवहार झाल्याचे दिसते व अशा प्रकारे ६५:३५ जमिनीचा व्यवहार हा कोणती जमिन सोडावयाची व कोणती जमिन घ्यावयाची हे प्रथम निश्चित करावयास पाहिजे होते. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही. यावर मंडळाचे सर्वसदस्यांनी सांगितले की, याप्रकरणी सखोल चौकशी करावी कारण या जमिनीच्या व्यवहारात दोष दिसून येतो. म्हणून या प्रकरणा बाबत वरील प्रमाणे मंडळाच्या सुचनेनुसार कार्यवाही तात्काळ करावी. व सखोल चौकशी करून अहवाल मंडळासमोर पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. याबाबत मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केली की, मंडळाच्या मा. सभापती यांनी व सर्व सन्माननीय सदस्यांनी यास गारखेडा येथे जमिनीची प्रत्यक्ष संयुक्त पाहणी करावी व त्यानंतर ६५% जमिनी बाबत मा कोर्टात फेर प्रतिज्ञापत्र दाखल करता येईल मा मुख्य अधिकारी यांनी मंडळास अशीही माहिती दिली की, सदर प्रकरण लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी मंडळाचे विधी सहाय्यक श्री. एस. पी. गोसावी यांना सुचना देण्यात येईल व श्री. गोसावी विधी सहाय्यक मंडळाच्या पॅनलवरील वकीलांना संपर्क साधून व पाठपुरावा करून प्रकरण लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी श्री एस पी गोसावी विधी सहाय्यक यांना सुचना देण्यात येतील असेही मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले. या प्रस्तुत करणातील सध:स्थितीची माहिती मंडळास पुढील बैठकीत सादर करण्यांत येईल. असेही मुअ/औमं. यांनी बैठकीत सांगितले. उपरोक्त प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने एक मताने निर्णय घेतला की,

ठराव क्र.

ठराव क्रं. ७१० :-

गारखेडा येथिल सि. टी. एस. क्रं. १५३०२ [भाग] १५३०३ [भाग] व १५३०६ [भाग] मधील ३५% जमिन विनामुल्य घेणे व ६५% जमिन संपादनातुन सोडणे याची सखोल चौकशी करण्यात यावी, ६५% जमिनीवरील बांधकाम परवानगी महानगरपालिकेस रद्द करण्यास तात्काळ कळवावे व जमिन मालकाने सुरु केलेले बांधकाम तात्काळ बंद करण्याची कार्यवाही मंडळाच्या संबंधित अधिका-यांनी करावी व मंडळाचे मा. सभापती व सर्व सन्माननीय सदस्य याचे समवेत उपरोक्त जमिनीची संयुक्त पाहणी करण्यासाठी मुख्य अधिकारी यांनी कार्यवाही करावी व संयुक्त पाहणी नंतर आवश्यकतेनुसार ३५% जमिन नेमकी कोणत्या बाजूची घ्याव्याची याबाबतीत सुधारित शपथपत्र मा. कोर्टात दाखल करणेबाबत मंडळाचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही मुख्याधिकारी यांनी करावी असा निर्णय मंडळाने घेतला.

विषय क्रं. [३] :- जालना येथिल बिडी कामगार योजना.

या विषयाच्या बाब टिप्पणी बाबत मुख्य अधिकारी यांनी सविस्तर माहिती दिली की, हे गाळे ब-याच वर्षांपासून वाटपा अभावी रिक्त आहेत त्याची सुरक्षा व देखभालीची जबाबदारी बांधकाम पुर्ण झाल्यापासून ६ महिन्या पर्यन्त संबंधित ठेकेदाराची असते व ६ महिन्यानंतर पुढील एक वर्षासाठी गाळ्याची देखभाल करण्यासाठी पहारेकरी नियुक्त करण्याचे अधिकार मुख्य अधिकारी यांना असून त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी सुरक्षा व्यवस्था नेमण्याचे अधिकार प्राधिकरणास आहेत. तथापि, त्याप्रमाणे पहारेकरी नेमण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर योजनेतील गाळ्यांच्या दरवाजे, चौकटी, खिडक्या, गायब झाल्या व त्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी अहवाल दिला यावर मंडळाचे सदस्य मा. श्री. खरात यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, गायब झालेल्या साहित्या विषयीची जबाबदारी मंडळाच्या अधिका-यांवर निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठीचा ठराव मंडळाने संमत केला असतांना-ही अद्याप या प्रकरणात कारवाई झाली नाही. मंडळाचे सदस्य मा. श्री. खरात व श्री. साबे यांनी बैठकीत सांगितले की, सदर रिक्त गाळे लवकरात लवकर भाडेखरेदी तत्वावर कमी केलेल्या किंमतीत वाटप करण्याची कारवाई तात्काळ करावी याबाबत मंडळाचे मा. सदस्य श्री. साबे व श्री. शिन्दे यांनी सुचविले की, मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी मंडळाचे मा. सदस्य श्री. खरात, राऊत व देशमुख यांच्या सोबत जाऊन सदर गाळ्यांची पाहणी करावी व मंडळाच्या सदस्यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने गाळे लवकरात लवकर वाटप करण्याच्या दृष्टीने उपाय योजना सूचवून त्या प्रमाणे मुख्य अधिकारी/ औरंगाबाद मंडळ

यांनी कारवाई करावी असे मंडळाच्या सर्व सदस्यांनी सुचविले. मंडळाच्या सर्व मा. सदस्यांनी असेही सुचविले की, गाळ्यांच्या झालेल्या मोडतोड व गायब झालेले सामान याबाबतीत जे जे संबंधित अधिकारी दोषी ठरतील त्यांच्यावर कारवाई करावी. या प्रकरणी चौकशी करणेसाठी नियुक्त केलेल्या उप समितीच्या वतीने कार्यकारी अभियंता श्री. येरावार यांनी प्राथमिक अहवाल दाखल केलेला असून त्यानुसार सदर गाळे पुर्ण झाल्याचे तारखे पासून आजपर्यन्तच्या संबंधित कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांचेकडून खुलासा मागवून तदनंतरच त्याचे विरुध्द पुढील कार्यवाही करणे योग्य होईल असे प्रस्तावित केलेले आहे. त्याप्रमाणे संबंधिताकडून खुलासा मागवून पुढील कार्यवाही करणेत येईल असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

उपरोक्त प्रमाणे चर्चा झाल्यानंतर सदर विषयावर मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७११ :

जालना येथील बिडी कामगार योजनेतील रिक्त असलेले गाळे भाडेखरेदी तत्वावर कमी केलेल्या किंमतीत विकण्याचा प्रयत्न करावा व गाळ्यांची मोडतोड व गायब झालेले साहित्य याबाबत संबंधित अधिकारी ~~कार्यकारी अभियंता व उप अभियंता~~ यांचेकडून खुलासा मागवून त्याआधारे जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतचा अहवाल मंडळाच्या आगामी ~~पुढील~~ बैठकीत सादर करावा. असा निर्णय मंडळाने सर्वानुमते घेतला.

विषय क्र. ४ : मंडळाचे रिक्त गाळे/भूखंड विक्री बाबत मंडळांतर्गत रिक्त गाळे भूखंड यांची विक्री करुन मंडळाचा अडकलेला निधी मोकळा होण्याच्या दृष्टीने प्रस्ताव........

सदर विषयाबाबत सविस्तर माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास देतांना सांगितले की, औरंगाबाद मंडळांतर्गत विविध ठिकाणी एकुण ३४७ गाळे/भूखंड मागणी अभावी रिक्त पडलेले आहे व त्यामध्ये मंडळाचा निधी अडकून पडलेला आहे. सदर गाळे जाहिरात देऊन विक्री करण्यासाठी वेळोवेळी मंडळाने प्रयत्न केला तसेच काही गाळ्यांच्या किंमती कमी करुन एकरक्कमी पध्दतीवर वाटप करण्याचा प्रयत्न केला परंतु गाळे विक्री होऊ शकली नाही. त्याची कारणे सविस्तररित्या बाब टिप्पणीत मंडळा समोर सादर केली आहे. अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी दिली, म्हणून आता गाळे विक्री करण्याचा दृष्टीने

अ] ११६ सदनिका एकरकमी पध्दतीवर न विकता त्या गाळ्याच्या किंमतीच्या २५% रक्कम अनामत घेऊन उर्वरित ७५% रक्कम कर्ज स्वरुपात व्याजदराने १५ वर्षाच्या कालावधीत परतफेडीच्या अटीवर वाटप करण्यासाठी व तसा

प्रस्ताव प्राधिकरणाच्या मुंजुरीसाठी मंडळासमोर सादर केला आहे.

ब] औरंगाबाद येथील ४ सदनिकांच्या किंमतीमध्ये [म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार ] कमी करुन विकण्यासाठी मुंडळाच्या मुंजुरीसाठी सादर केला आहे.

क] गेवराई व उदगिर येथील गाळे किंमत कमी करुन विकणे ऐवजी गाळ्याच्या कर्ज व परतफेडीचा हप्ता १.६ २००२ पासून १४ वर्ष करण्यासाठी व त्यास मुंडळाची मुंजुरीस्तव सादर केला आहे व,

ड] जालना येथील ४ भूखंडांच्या किंमती कमी न करता ते व्यापक प्रसिध्दी देऊन वाटपास मंडळाने मुंजुरी देण्यास्तव सादर केला आहे.

वरील प्रमाणे अ,ब,क, व ड, मध्ये प्रस्तावित केल्यानुसार व त्याप्रमाणे गाळे/ भूखंड विक्रीचे प्रयत्न केल्यास गाळे /भूखंड विक्री होऊ शकतील असे मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले.

वरील प्रमाणे माहिती मंडळासमोर सादर केल्यानंतर मुंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी सांगितले की, मुंडळाने गाळे विक्री करण्यास व अडकलेला निधी मोकळा होण्यास मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही व प्रयत्न करणे आवश्यक आहे म्हणून मुंडळाने वरील अ,ब,क, व ड मधील प्रस्तावास एकमताने मान्यता दिली व उपस्थित विषयावर वरील प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मुंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र.७१२ :-

वरील प्रमाणे अ,ब,क, व ड मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे व सदर अ,ब,क व ड या प्रस्तावास मुंडळ मान्यता देत आहे व सदर प्रस्तावाप्रमाणे गाळे/भूखंड वाटपासाठी मुंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करावी असेही निर्णय मुंडळाने एकमताने घेतला.

विषय क्र ५:- औरंगाबाद मुंडळातर्फे तालुका स्तरावर योजना राबविण्यास्तव आजमाविलेला मागणी अंदाज व त्या अनुषंगाने करण्यात आलेली भूसंपादनाची कार्यवाही ...

प्रस्तुत विषयाच्या बाब टिप्पणीतील माहिती मुख्य अधिकारी यांनी सांगीतली की, १९९७ मध्ये मुंडळातर्गत तालुक्याच्या ठिकाणी गाळे बांधण्याची शक्यता व मागणी अजमावून पाहण्यासाठी जनतेकडून साध्या कागदावर अर्ज घेऊन तात्पुरता मागणी अंदाज अजमाविला व त्यावेळी एकूण ७७,३११ अर्ज प्राप्त झाले. त्यानुसार १७ तालुक्यांच्या ठिकाणी शासकीय जमिन मिळविण्यासाठी महसूल विभागाकडे प्रस्ताव पाठविले परंतु अद्याप जमिन प्राप्त झाल्या नाहीत व जमिनी मिळविण्यासाठी महसूल विभागाकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. शासकीय जमिनी प्राप्त झाल्यानंतर त्या त्या तालुक्याच्या ठिकाणी अत्यल्प /अल्प उत्पन्न गटाच्या योजनेतील गाळ्यांसाठी ठोस मागणी अजमाविण्यात येणार आहे. व ठोस मागणी प्राप्त झाल्यानंतरच तालुक्याच्या ठिकाणी गृहनिर्माण योजना

..१०..

प्रस्तावित करता येऊ शकतील अशीही माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. मुख्य अधिकारी यांनी असेही सांगितले की, गेवराई जि. बीड व ~~उदमगिर~~ [उदगीर] जि. लातूर या तालुक्याच्या ठिकाणी ठोस मागणी प्राप्त झाली होती म्हणून तेथे मंडळ गाळे बांधून योजना पुर्ण करू शकले व भोकरदन येथे योजना कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आहे. सेलू व मुखेड येथे ठोस मागणी न मिळाल्यामुळे योजना कार्यान्वित होऊ शकली नाही. मुख्य अधिकारी यांनी असेही सांगितले की, तालुक्याच्या ठिकाणी शासकीय व खाजगी जमिनी मिळविण्याचे अटोकाट प्रयत्न करण्यात येत आहेत व जमिनी ताब्यात आल्यानंतर तालुका स्तरावर ठोस मागणी अजमावूनच गृहनिर्माण योजना कार्यान्वित होऊ शकतील. यावर मंडळाच्या सर्व मा सदस्यांनी सांगितले की, तालुक्याच्या ठिकाणी जमिनी मिळविण्यासाठी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यन करावेत व जमिनी मंडळाच्या ताब्यात आल्यानंतर तेथे गृहनिर्माण योजना राबविण्याची कार्यवाही करण्यांत यावी. याबाबत मंडळाचे सदस्य मा. श्री. जे. पी. पाटील यांनी सांगितले की, मंडळाने काही वर्षापुर्वी काही तालुक्यातल्या ठिकाणी जसे की, हदगांव, नायगांव, बिलोली, नळदुर्ग इ. ठिकाणी जमिनीची मागणी ~~मह~~ महसूल विभागाकडे केली होती परंतु या जुन्या प्रकरणाबाबत मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून पाठपुरावा केला जात नाही व जमिनी मिळविण्यासाठी प्रयत्न केला जात नाही व नविन ठिकाणांचे जमिनीची मागणी केली जात आहे. म्हणून गेल्या १० वर्षात ज्या ज्या तालुक्याच्या ठिकाणी जमिनीची मागणी मंडळाने केली होती त्या त्या ठिकाणच्याही जमिनी मिळविण्यासाठी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत व त्याच बरोबर इतर तालुक्यात आता शासकीय जमिन मिळविण्याचाही प्रयत्न करावा. जेणे करून जास्तीत जास्त जमिनी मंडळाकडे प्राप्त होतील श्री जे पी. पाटील यांनी खेद व्यक्त केला की, अर्धापूर व मुदखेड येथे गृहनिर्माण योजनेचे भूमिपूजन होऊन देखिल तेथे मंडळाच्या योजना अजूनही सुरू झालेल्या नाही. त्यामुळे अर्धापूर व मूदखेड येथे गृहनिर्माण योजना लवकरात लवकर सुरु करण्यासाठी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई करावी. ~~असे मा श्री जे. पी. पाटील, सदस्य यांनी सांगितले~~ मा. सदस्य श्री. साबे यांनी असे सांगितले की, जोपर्यंत मंडळाच्या ताब्यात जमिनी येत नाही तो पर्यंत गृहनिर्माण योजनेचे प्रस्ताव मंडळासमोर सादर करू नयेत.

वरील प्रमाणे चर्चा केल्यानंतर प्रस्तुत विषयावर मंडळाने असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ७१३ :-</u>

तालुक्याच्या ठिकाणी शासकीय/खाजगी जमिनी मिळविण्यासाठी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत व जमिन ताब्यात आल्यानंतर त्या त्या ठिकाणी ठोस मागणी अजमावून योजना राबविण्यासाठी कार्यवाही करावी. ~~असा निर्णय मंडळाने सर्वानुमते घेतला.~~

विषय क्र. ६:- वाल्मिकी -आंबेडकर आवास योजने बाबत माहिती..

या विषयाच्या बाब टिपणी बद्दल मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना ही केंद्र शासन व राज्य शासनाच्या अर्थ सहाय्याने राबविण्याचे प्रस्तावित आहे व ही योजना राज्यात ६१ शहरात राबवावयाचे राज्य शासनाने सुचविले आहे. व ही योजना प्राधिकरणा-मार्फत राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना ही ग्रामिण भागात देखिल राबविण्यात यावी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. व तो प्रस्ताव शासनाने मंजुर करण्याविषयी पाठपुरावा करण्यांत येत आहे. असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले. मुख्य अधिकारीयांनी असेही सांगितले की, शासनाने या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी संबं करण्या संबंधीचे निश्चित धोरण अद्याप जाहिर केलेले नसल्यामुळे योजना कशा प्रकारे हाती घ्यावी याबाबत संकल्पना स्पष्ट नाहीत. याबाबत मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी सुचविले की, ही योजना ६१ शहराव्यतिरिक्त ग्रामिण भागात राबविण्यासाठीची मंजुरी शासनाकडून मिळविण्यासाठी व योजनेची नक्की अंमलबजावणी कशा प्रकारे करावी लागेल याबाबतीत शासनाचा निर्णय प्राप्त करुन घेणेसाठी पत्रव्यवहार करुन कार्यवाही करावी.

वरील प्रमाणे चर्चा अंती मंडळाने सदर विषयावर एकमताने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र ७१४ :-

सदर योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे करावी लागेल व शासनाचे या योजनेविषयी निश्चित धोरणात्मक निर्णय प्राप्त करुन घेण्यासाठी व तसेच ६१ शहरा व्यतिरिक्त ही योजना ग्रामिण भागात देखील राबविण्यासाठीची मंजुरी शासनाकडून मिळविण्यासाठी मंडळाच्या अधिका-यांनी शासनाकडे पाठ-पुरावा करावा ~~असा निर्णय मंडळाने सर्वानुमते घेतला~~ सहानिकेत

विषय क्र. ७:- मंडळातर्गत चालू असलेली राष्ट्रीय ~~आवास~~ योजना, लोक आवास योजना, राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम.

या विषयाच्या बाब टिपणीतील माहिती देतांना मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, राष्ट्रीय गृहनिर्माण योजना अंतर्गत बांधावयाच्या सदनिका औरंगाबाद मंडळास ३ टप्प्यात बांधावयाचे ठरले आहे. औरंगाबाद मंडळास दिलेली उद्दिष्टे हे १५४८५ घरांचे असून पहिल्या टप्प्यात . 2548 गाळयांचे बांधकाम पुर्ण झाले आहे. दुस-या टप्प्यातील 3090 गाळे बांधण्याचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजना शासकीय जमिनीवर प्रस्तावित करण्यांत येत आहे. व तिस-या टप्प्यातील उर्वरित गाळे बांधण्याचे नियोजन करण्यांत येत आहे. मुख्य अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, दुस-या टप्प्यातील उद्दिष्ट हे मंडळाच्या अव्वारित शासकीय जमिनी ताब्यात मिळाल्यानंतर

..१२.

व त्यास ठोस मागणी अजमावून पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. तिस-या टप्प्यातील उद्दिष्ट हे मनपा/नपा/एमआयडीसी/सिडको यांचेकडून जमिनी प्राप्त झाल्यास त्यावर योजनेचे नियोजन करून उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले. याबाबतीत मंडळाचे सदस्य यांनी प्रतिपादन केले की, मंडळांतर्गत जास्तीत जास्त गाळ्यांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. मंडळाचे जास्तीत जास्त काम वाढविणे आवश्यक आहे व त्या दृष्टीने चालूवर्षी ६००० घरांचे उद्दिष्ट मंडळास ठेवणे आवश्यक आहे असे मा. सदस्य श्री. शिंदे यांनी सांगितले. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मंडळाला जमिनी ताब्यात मिळाल्या नंतर व योजनेस ठोस मागणी प्राप्त झाल्यावरच मंडळास दिलेले घरे बांधण्याचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल

लोक आवास योजनेअंतर्गत मंडळाच्या अतिरिक्त जास्तीत जास्त सदनिका बांधण्यासाठी मंडळाच्या सर्व मा सदस्यांनी सुचना केली राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रमाबाबतची जी माहिती मंडळासमोर सादर केली त्याबाबतची नोंद मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी घेतली

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर सदर विषयावर मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ७१५</u> :-

राष्ट्रीय गृहनिर्माण योजना अंतर्गतचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शासकीय व निमशासकीय जमिन मिळविण्याचा मंडळाच्या अधिका-यांनी प्रयत्न करावा व जस जशा जमिनी ताब्यात घेतील त्याप्रमाणे त्या ठिकाणी ठोस मागणी अंदाज अजमाविण्यासाठी कार्यवाही करावी. ~~असा निर्णय मंडळाने एकमताने घेतला.~~ तसेच लोक आवास योजनेअंतर्गत जास्तीत जास्त सदनिका बांधण्याचा मंडळाच्या अधिका-यांनी प्रयत्न करावा ~~असा निर्णय मंडळाने एकमताने घेतला.~~

*वरील/प्रमाणे*

वरील प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मंडळाचे मा. सदस्य यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले. व त्यावर कार्यवाही करण्यासाठी सुचित केले.

१] मा. सदस्य डॉ शिन्दे यांनी बैठकीत सांगितले की, मुकुंदवाडी औरंगाबाद येथील एम आय जी योजनेतील ४ गाळे एस एस ई बी ला देण्याचे विचाराधिन होते परंतु आता एमएसईबीला गाळे द्यावयाचे नाही. असे ठरले आहे. त्यामुळे या ४ गाळ्यांपैकी एक गाळा याच योजनेतील एक लाभधारक यांना बदलून देण्यासाठी विचार करावा. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर प्रकरण तपासून त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

२] डॉ. शिन्दे यांनी सांगितले की, देवळाई येथील शासकीय जमिन व कन्नड येथील शासकीय जमिनीची प्रकरणे सध्या कोणत्या स्तरावर प्रलंबित आहेत व जमिन ताब्यात मिळण्यास का विलंब होतो यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की

देवळाई व कन्नड येथील शासकीय जमिनी उपलब्ध करुन घेण्याचे प्रस्ताव मंत्रालयात शासन स्तरावर प्रलंबित आहे व जमिनी मिळविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

३] मंडळाचे मा. सदस्य डॉ. शिंदे यांनी बैठकीत मुद्दा उपस्थित केला की, गृहनिर्माण भवनाजवळील मोकळ्या भूखंडावर व मुकुंदवाडी, औरंगाबाद येथील मंडळाच्या जमिनीवर मंडळाने व्यापारी संकुले बांधण्याचे नकाशे तयार करुन त्याचा विकास करण्याचे मंडळाने ठरविले होते. परंतु सदर बाबतीत पुढील काय कार्यवाही झाली याची माहिती मंडळापुढे सादर करण्यात आली नाही व मा. सदस्य डॉ. शिंदे यांनी असेही सांगितले की, वरील दोन्हीही जमिनीवर व्यापारी संकुलाची योजना राबविण्यासाठी लवकर कार्यवाही करावी याबाबत मुख्य अधिकारी यांनी बैठकीत माहिती दिली की, वरील दोन्ही ठिकाणी व्यापारी संकुले बांधण्यासाठीची नकाशे प्राधिकरणास मंजूरीसाठी पाठविले होते व त्यास प्राधिकरणाची मंजूरी मिळालेली आहे. सध्या योजनेचे अंदाजपत्रके तयार करण्याचे काम चालू आहे. ते पुर्ण झाले बरोबर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

४] मंडळाचे सदस्य मा. श्री. राऊत यांनी बैठकीत सांगितले की, जालना येथील मंडळाच्या काही जुन्या वसाहती आहेत व तेथे ब-याचशा सुविधा नाहीत व गाळ्यांची नैसर्गिक आपत्तीमुळे मोडतोड झालेली आहे. म्हणून अशा जालना येथील जुन्या वसाहतीतील सुविधा सांठी व गाळ्यांना दुरुस्तीसाठी मंडळातर्फे आर्थिक तरतूद देऊन वरील सुविधा देता येतील का ? किंवा तशी आर्थिक तरतुद आहे काय ? अशी विचारणा केली यावर मा. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, जुन्या वसाहतीतील सुविधांसाठी किंवा गाळ्यांच्या दुरुस्तीसाठी मंडळाकडे आर्थिक तरतुद नसते. परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या घरांचे दुरुस्तीसाठी [मा.] जिल्हाधिकारी, जालना यांचेकडून नैसर्गिक आपत्तीसाठीच्या राखीव असलेल्या निधीतून निधी प्राप्त झाल्यास जालना येथे मंडळाच्या जुन्या वसाहतीतील सुविधा व गाळ्यांच्या दुरुस्तीसाठी खर्च करता येऊ शकेल. याबाबत कार्यकारी अभियंता यांनी सविस्तर पाहणी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात येईल व तद्नंतर त्यासाठी म्हाडा, मुंबई कार्यालय, जिल्हाधिकारी, जालना यांचेकडे वरील कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

५] मंडळाच्या सदस्या मा. सौ. गायकवाड यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, परभणी येथील मंडळाच्या स. नं. ५२७ मधील वसाहतीमधील मोकळा भूखंड नुतन शिक्षण संस्था यांनी त्यांच्या शाळेसाठी मागीतला होता. परंतु मंडळाच्या संबंधित अधिका-यांनी असे सांगितले की, सदरचा भूखंड हा व्यापारी भूखंड [Commercial plot ] असल्यामुळे तो जाहिरातीद्वारे कमर्शियल भूखंड म्हणून नियमानुसार वाटप करणे भाग आहे व ज्या वेळा अशी जाहिरात मंडळ देईल त्यावेळेस सदर शिक्षण संस्थेने भूखंडासाठी अर्ज सादर करावा. याबाबत

मंडळाच्या सदस्या मा. सौ. गायकवाड व श्री. साबे व श्री. इनामदार यांनी असे सुचविले की, म्हाडा, मुंबई कार्यालयाने जर सदर भूखंड संस्थेस देण्यास मंजूरी दिली तर भूखंड संस्थेस देता येईल काय ? यावर मंडळाचे मिळकत व्यवस्थापक यांनी सांगितले की, नुतन शिक्षण संस्था, परभणी यास परभणी येथील मंडळाच्या वसाहतीमधील भूखंड देण्यासाठीचा प्रस्ताव म्हाडा, मुंबई मार्फत शासनाचे गृहनिर्माण विभागाकडे मंजूरीसाठी पाठवणे आवश्यक आहे.

६] मंडळाचे सदस्य मा. श्री. साबे व श्री. इनामदार यांनी सांगितले की, लातूर येथील मंडळाचे कार्यकारी अभियंता व उप अभियंता हे मंडळाच्या सदस्यांना माहिती देत नाहीत. तसेच लातूर येथे कार्यालयासाठी जी नविन जागा भाड्याने घेतली आहे ती मंडळाच्या लातूर येथील मा. सदस्यांना न विचारता भाड्याने घेतली व कार्यालय नविन जागेत हलविण्यात आले म्हणून अधिकाऱ्यांची ही कृती योग्य नाही. व अधिकाऱ्यांनी मंडळाच्या सदस्यांना कार्यालयीन कामाची माहिती देऊन कामे करणे अपेक्षित आहे. परंतु तसे घडत नाही. तसेच मंडळाच्या मा. सदस्या सौ. गायकवाड यांनी बैठकीत सांगितले की, परभणी येथे कार्यालयात मंडळाचे अधिकारी भेटत नाहीत व लोक आवास योजनेच्या कामाची माहिती ग्रामिण निवारा योजनेची माहिती देत नाही. यावर मुख्य अधिकारी यांनी मंडळास सांगितले की, मंडळाचे कार्यकारी अभियंता व सर्व उप अभियंता/जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांना सुचना देण्यात येतील की, त्यांनी मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य यांना मंडळाचे योजनेची माहीती द्यावी. व मंडळाचे कामाविषयी अवगत करत जावे.

७] मंडळाचे मा. सदस्य श्री. राजेश्वर चव्हाण व श्री. इनामदार यांनी सांगितले की, ग्रामिण निवारा योजनेच्या जिल्हास्तरीय कमिटीमध्ये मंडळाचे त्या-त्या जिल्ह्याचे सदस्य यांना जिल्हा ग्रामीण योजनेच्या बैठकीसाठी सदस्य म्हणून किंवा विशेष आमंत्रित म्हणून बोलावावे असे पत्र जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. जिल्हाधिकारी यांना मंडळातर्फे देण्यात यावे. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, ~~असे पत्र शासनाकडे पाठविण्यात येईल.~~ याबाबत शासन मान्यतेसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल

८] मंडळाचे मा. सदस्या सौ. गायकवाड यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, परभणी येथील राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कामाची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे. सदस्यांच्या प्रमाणपत्रा शिवाय राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजनेतील कामाचे देयके मंजूर करु नयेत असेही त्यांनी प्रतिपादन केले. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कामाची देयके ही संबंधित जिल्ह्याचे मा. सदस्य व त्याचे प्रमाणपत्र घेतल्या नंतरच मंजूर करण्यात येतात.

९] मंडळाचे सदस्य मा. श्री. चव्हाण यांनी सांगितले की, औरंगाबाद मंडळावरील नेमलेल्या वकीलाचे पॅनल बदलणे जरुरी आहे. कारण सध्याचे वकील मंडळाची बाजू कोर्टात निटपणे मांडीत नाही. याबाबत यापूर्वी देखिल मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली परंतु त्यावर काही कार्यवाही झाली नाही असेही त्यांनी प्रतिपादन केले. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत कार्यवाही केली जाईल व मंडळासमोर माहिती सादर करण्यांत येईल.

१०] मंडळाचे मा. सदस्य श्री. देशमुख यांनी सांगितले की, भोकरदन येथील योजनेचे भूमिपूजन होऊन देखिल योजनेचे काम अद्याप सुरु झालेले नाही. याबाबत कार्यकारी अभियंता श्री. येरावार यांनी माहिती दिली की, या योजनेस प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाकडून मिळवून व सर्व इतर बाबींची पुर्तता करुन योजनेतील गाळ्यांचे बांधकाम सुरु करण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे व हे काम निविदा पध्दतीवर करावयाचे असल्यामुळे निविदा मागविण्यासाठी कार्यवाही करण्यांत येत आहे. या योजनेचे काम लवकर सुरु व्हावे व तसेच गाळ्यांचे बांधकामही लवकरात लवकर पुर्ण व्हावे म्हणून सदर काम हे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देण्यांत यावे असे मा. सदस्य श्री. देशमुख यांनी सांगितले. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, भोकरदन येथील योजनेची किंमत जास्त असल्याने गाळ्यांचे काम हे निविदा पध्दतीने करण्यासाठी प्राधिकरणाने मंजूरी दिलेली आहे.

११] मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, मंडळाच्या प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांचे कार्यालयासाठी स्वतंत्र कार्यालय व दुरध्वनी असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांचे कार्यालयास सदस्यांसाठी एक स्वतंत्र कक्ष ठेवण्यासाठी आवश्यक आहे. म्हणून वरील बाबी पूर्ण करण्यासाठी मुख्य अधिकारी यांनी कार्यवाही करावी याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांचे कार्यालयासाठी स्वतंत्र जागा देणे त्यांना दुरध्वनी देणे व सदस्यांसाठी जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांचे कार्यालयात स्वतंत्र कक्ष ठेवण्यासाठी ठेवणे या बाबतचा प्रस्ताव म्हाडा, मुंबई कार्यालयास मंजूरीसाठी सादर करण्यांत येईल.

१२] मा. सदस्य श्री. साबे व मा. श्री. इनामदार यांनी बैठकीत सांगितले की, लातूर शहरात व परळी वैजोनाथ येथे दि. २६.५.०२ रोजी लोक आवास योजनेच्या कामाचा शुभारंभ मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व मा. गृहनिर्माण मंत्री महोदय व

गृहनिर्माण राज्यमंत्री, यांचे उपस्थितीत व लातूर येथे स्थानिक आमदार यांचे उपस्थितीत करण्यात यावे व यासाठी उपरोक्त दोन्हीही ठिकाणी लाभार्थ्यांची यादी [नगर परिषदेच्या वतीने ] तयार करुन घेऊन ते मंडळाच्या अधिका-यांनी प्राप्त करुन घ्यावी, म्हणजे उपरोक्त कार्यक्रम घेता येईल अशी सुचना मा सदस्य श्री. सावे व श्री. इनामदार यांनी केली. याबाबत मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य यांनी सर्वानुमते ठरविले की, दि २६ ५.२००२ रोजी लातूर व परळी वैजीनाथ येथील लोक आवास योजना कामाचा शुभारंभ मा. मुख्यमंत्री व मा गृहनिर्माण मंत्री यांचे उपस्थितीत घेण्यासाठी मा मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांची तारीख घेण्यासाठी कार्यवाही करावी याबाबत मा मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, कार्यकारी अभियंता/लातूर यांना प्रथम सुचना देऊन लोक आवास योजना अंतर्गत लातूर व परळी वैजीनाथ येथे कोणत्या घोषित झोपडपट्टयात कार्यक्रम घेता येईल व लाभार्थींची यादी प्राप्त करुन घेण्यासाठी कळवून माहिती प्राप्त झाल्यानंतर लोक आवास योजनेअंतर्गत [लातूर व परळी वैजीनाथ व अन्य ठिकाणीही ] शासनाने घोषित केलेल्या झोपडपट्टयात दि २६ ५ २००२ रोजी योजनेचा शुभारंभ करण्यासाठी कार्यकारी अभियंता/औरंगाबाद विभाग व लातूर वि यांनाहा कळवून कार्यवाही करण्यासाठी सांगण्यात येईल. असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

१३] सामाजिक सुविधा अंतर्गत [illegible] झोपडपट्टीत/दवाखाना बांधण्या या/जो प्रस्ताव मंडळाने मंजुरीसाठी म्हाडा मुंबई कार्यालयाकडे पाठविला आहे तो मंजूर करुन घेणेसाठी पाठपुरावा मंडळाच्या अधिका-यांनी करावा असे सदस्य मा. श्री. सावे, इनामदार यांनी सांगितले. याबाबत ~~पाठपुरावा करण्यात येईल असे~~ मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

१४] मंडळाचे मा. सदस्य श्री. उपासे यांनी बैठकीत सांगितले की, क्रांतीचौक औरंगाबाद येथील एक जमिन मालक त्यांची जमिन मंडळाला योजनेसाठी [illegible] विक्री करण्यास तयार आहे. व जमिनीच्या सर्व तपशिलासह त्यांनी मंडळाकडे अर्ज केला आहे. तरी या जमिनीची पाहणी करुन मंडळाच्या अधिका-यांनी पहाणी करावी व सदर जमिनी बाबतचा अहवाल मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवावा असे मा. उपासे सदस्य यांनी सांगितले. जमिनीची पाहणी करुन तसा अहवाल मंडळा-समोर ठेवण्यांत येईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

१५] लातूर येथे ६१ ५ गाळे अत्यल्प उ. गट बांधले आहे व ते वाटप देखिल केले आहे. परंतु काही गाळयात गाळेधारक रहाण्यास गेले नाही. म्हणून जे गाळेधारक तेथे रहाण्यास गेले नाही त्यांचे गाळा वाटपाचे पत्र रद्द करावे जेणे करुन गाळयाच्या बाबतीत गैर व्यवहार होणार नाही असे मंडळाचे सदस्य मा. श्री. सावे व इनामदार यांनी प्रतिपादन केले. काही गाळेधारक वसाहतीमध्ये अनाधिकृत बांधकाम करीत आहे व काही लोक अनाधिकृतपणे राहत आहे. त्यामुळे याबाबत कायदेशिर

कारवाई करावी व त्यांना नोटीसा धाव्यात असेही मंडळाचे सदस्य मा. श्री. सावे व मा.श्री. इनामदार यांनी सांगितले. याविषयी मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, अनाधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी नगर परिषद लातूरला कळविण्यात येईल. अनाधिकृत गाळेधारकांबाबत व अनाधिकृत बांधकामा विषयीचे प्रकरणे सक्षम प्राधिकारी [सीए ] यांचेकडे दाखल केले जातील. ~~तसेच अशी प्रकरणे लवकर निकाली निघावी म्हणून मंडळाचे उप अभियंता किंवा कार्यकारी अभियंता यांना सक्षम प्राधिकारी [सी ए ] म्हणून~~ मुख्याधिकारी यांना यांचे अधिकार प्रदान करण्यात यावे म्हणून प्राधिकरणास प्रस्ताव पाठविण्यात यावा असे मुख्य अधिकारी यांनी ~~बैठकीत सांगितले.~~ सूचविले व त्यास मंडळाने मान्यता दिली.

१६] परभणी येथील मंडळाच्या जून्या वसाहतीमधील टिआरटी गाळया जवळील जो मोकळा भूखंड आहे तो शासनाच्या दोन टक्के स्वेच्छा आरक्षणातून मिळावा म्हणून परभणीचे श्री. देशमुख व श्री. परसावत यांनी अर्ज केले आहे. व त्याबाबत शासनाने अहवाल मागितला आहे असे मुंडळाचे सदस्या मा. सौ गायकवाड यांनी सांगितले व शासनाकडे अहवाल पाठविला काय ? या बाबत विचारणा केली याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मंडळाचे मिळकत व्यवस्थापक यांना शासनाकडे अहवाल पाठविण्यासाठी सुचना देण्यात येतील

१७] मंडळाचे सदस्य मा श्री. सावे मा. श्री इनामदार यांनी सांगितले की, लातूर येथे मंडळातर्फे नगर परिषदेच्या मालकीच्या जमिनीवर विश्रामगृह बांधण्याच्या प्रस्ताव मागिल बैठकीत चर्चेला गेला. परंतु सदर विश्रामगृह मंडळातर्फे नगरपरिषदेच्या जमिनीवर न बांधता ते नगराच्याच ग्रिम बेल्ट मधील जमिनीवर बांधण्याचे प्रस्तावित करावे. असे सदस्य मा. श्री. इनामदार यांनी सांगितले. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, नगराच्या मालकीच्या ग्रिन बेल्ट मधील / शासन मिळाल्यास त्या जमिनीवर बांधण्याचे प्रस्तावित करण्यात येईल.

१८] मंडळाचे सदस्य मा. श्री. देशमुख यांनी सांगितले की, जालना जिल्हयात घणसावंगी ~~दाणसावंगी~~ या तालुक्याच्या ठिकाणी व वालसावंगी येथे ग्रामिण निवारा योजना अंतर्गत योजना घेण्यासाठी कार्यवाही करावी. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, घणसावंगी या तालुक्याच्या ठिकाणी व वालसावंगी येथे शासकीय जमिन मिळविण्यासाठी प्रयत्न करुन घरास ठोस मागणी अजमावून पुढील कार्यवाही करण्यात येईल. घणसावंगी व वालसावंगी येथे शासकीय जमिन मिळण्यासाठी जिल्हाधिकारी जालना यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल असेही मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

Action to be taken

१९] मंडळाचे सदस्य मा. श्री. बरात यांनी अंबड येथे मत्सोदरी देवी जवळील २.०० हे. शासकीय जमिन गृहनिर्माण योजना राबविण्यास उपयुक्त आहे व सदर जमिन मिळण्यासाठी जिल्हाधिकारी जालना यांचेकडे प्रस्ताव पाठवावा.

२०] मा सदस्य ॲड जे. पी. पाटील यांनी सांगितले की, ग्रामिण निवारा

योजने अंतर्गत नायगांव [ जि. नांदेड] येथे योजना राबविण्यासाठी तेथे शासकीय जमिन मिळण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे पाठवावा. नायगांव जिल्हा नांदेड येथे शासकीय जमिन मिळण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे पाठविण्यांत येईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

२१] मा. सदस्य ॲड. जे. पी. पाटील यांनी सांगितले की, हिमायतनगर [जि. नांदेड] येथे काही खाजगी जमिनी गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी उपयुक्त आहे व हिमायतनगर येथे जमिन उपलब्ध झाली तर तेथे ग्रामिण निवारा योजने अंतर्गत योजना राबविता येईल. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मंडळाचे संबंधित उप अभियंता हिमायतनगर येथे खाजगी जमिनी गृहनिर्माण योजनेस उपलब्ध आहेत काय ? याची माहिती गोळा करण्यास सुचना देण्यांत येतील व माहिती प्राप्त झाल्यास त्यानंतर जमिन घेण्यासाठी प्रस्तावित केले जाईल.

२२] मा. सदस्य श्री. चव्हाण यांनी सांगितले की, राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत परळी वैजीनाथ येथे १० झोपडपट्ट्यात विंधन विहिरी घेण्याचा प्रस्ताव नगर परिषद परळी वैजीनाथने मंडळाच्या कार्यालयात सादर केला आहे. व हे या कामास मंजूरी देता येऊ शकेल काय ? याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, ही बाब नियमाप्रमाणे तपासून त्यावर कार्यवाही करता येऊ शकेल.

२३] मंडळाचे सदस्य मा. श्री. राऊत यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, स. क्रं. ४१३ स्टेशन रोड, जालना येथील १०० गाळे अल्प उत्पन्न गट योजनेचे बांधकाम चांगल्या दर्जाचे झाले नाही तसेच सदर काम बांधून मुदतीत पुर्ण झाले नाही. सदर कामाची तपासणी करणे आवश्यक आहे व या कामाबाबत सत्य परिस्थिती अहवाल मंडळा समोर सादर करावा असेही मा. श्री. राऊत यांनी सांगितले. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर कामाच्या गुणवत्ते बाबतचा अहवाल मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यांत येईल.

२६] मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रतिपादन केले की, मंडळांतर्गत सर्व रिक्त भूखंडाची व गाळ्यांची माहिती मंडळाच्या सर्व सदस्यांना देण्यांत यावी मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर माहिती मा. सदस्यांना देण्यांत येईल.

वरील प्रमाणे चर्चा झाल्यानंतर बैठकीचे मा. सभापती यांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

[ कु. बी. गवळी. ]
मुख्य अधिकारी तथा उपसभापती,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.